प्र.१ अ) 'कविता' ही एक अनेकांगी, व्यामिश्र संकल्पना आहे,' या विधानाचा परामर्श घ्या. (१५)

**किंवा**

ब) 'कविता' ही संकल्पना स्पष्ट करून 'कविता' या साहित्य प्रकाराची चिकित्सा करा.

प्र.२ अ) 'कवी बा. सी. मर्ढेकर यांच्या काव्यात व्यापक जाणिवांचा आविष्कार दिसतो,' तुम्ही अभ्यासलेल्या 'निवडक कविता' या संग्रहाच्या आधारे साधार चर्चा करा. (१५)

**किंवा**

ब) 'प्रेम म्हणजे प्रेम असतं' या कवितेतून कवी मंगेश पाडगावकर प्रेमभाव कशाप्रकारे व्यक्त करतात, ते साधार लिहा.

प्र.३ अ) 'माझ्या कवितेला यावा' या कवितेतून कवी इंद्रजित भालेराव यांनी कवितेबद्दल कोणत्या भावना व्यक्त केल्या आहेत, ते सविस्तर लिहा. (१५)

**किंवा**

ब) 'नंतर आलेले लोक' या कवितेतून मूळच्या लोकांवर नंतर आलेल्या लोकांनी केलेल्या आक्रमणाची व्यथा कवी अरुण काळे यांनी कशी मांडली आहे, ते साधार लिहा.

प्र.४ टीपा लिहा. (प्रत्येक गटातील एक)

अ) संतकवी 'ज्ञानेश्वर' (०५)

**किंवा**

शाहिरी काव्य

ब) 'संसार' कवितेचे रसग्रहण (०५)

**किंवा**

'आई झाल्यावर' कवितेचे शीर्षक

क) 'गवताच्या वाळलेल्या मुळांसारखी' या कवितेतील आशय (०५)

**किंवा**

'वय वाढत जातंय आपलं' या कवितेतील वेदना

प्र.५ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (१५)

१. तेराव्या शतकांपासूनची उज्ज्वल परंपरा कोणत्या साहित्याला आहे?

२. मराठी कविता कोणत्या स्वरुपात अवतरली?

३. 'मराठी काव्याचे वैभव' कोणत्या कवींच्या रचनेला मानतात?

४. 'मराठी काव्याची पहाट' कोणत्या काव्याला म्हटले जाते?

OP3ABC

५. संत, पंडित, शाहीर या तीन प्रकारच्या काव्यासाठी कोणत्या तीन शब्दांचा वापर केला गेला ?

६. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म कोणत्या गावी झाला ?

७. बा. सी. मर्ढेकर यांनी कोणत्या विषयाचे अध्यापन केले ?

८. 'शिशिरागम' या कवितासंग्रहाच्या कवीचे नाव लिहा.

९. पद्मा गोळे यांच्या काव्यलेखनावर कोणाचा प्रभाव पडला आहे ?

१०. 'जिप्सी' या काव्यसंग्रहाच्या कवीचे नाव लिहा.

११. अनुराधा पाटील यांचा जन्म कोणत्या गावी झाला ?

१२. 'सायरनचे शहर' या काव्यसंग्रहाच्या कवीचे नाव लिहा.

१३. 'पीकपाणी' या काव्यसंग्रहाच्या कवीचे नाव लिहा.

१४. आपल्या कवितेला कोणता दरवळ यावा असे कवी इंद्रजित भालेराव यांना वाटते ?

१५. कवी वीरधवल परब यांच्या काव्यसंग्रहाचे नाव लिहा.

❀❀❀